महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्र नगर, कोल्हापूर. ४१६००४

परिपत्रक क्र.कोविमं /माध्य. परीक्षा/सप्टें-ऑक्टो २०२१/श्रेणी तक्ते/ ९०८८ / दिनांक १५/०९/२०२१

*वाचा:- संदर्भ:-* इ.१०वी सप्टें ऑक्टो-२०२१ तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते भरण्याच्या सूचनांबाबत दि.१३/०९/२०२१ रोजीचे परिपत्रक

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सप्टें/ऑक्टो-२०२१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते (Grade List) OMR पध्दतीप्रमाणे मंडळाच्या अधिकृत वितरण केंद्रांमार्फत सर्व शाळांना वितरीत करण्यात आलेली आहेत. तरी सदरची पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते बिनचूक भरुन ते वितरण केंद्रावरील प्रतिनिधीकडे निर्धारित वेळेत हस्तपोहोच जमा करण्यात यावेत. **उशीरा प्राप्त होणाऱ्या श्रेणी तक्त्याबाबत दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** सदरचे श्रेणीतक्ते इतर कोणत्याही पाकिटात न भरता मंडळ कार्यालयाने पुरविलेल्या श्रेणी तक्त्याच्या (Grade List) पाकिटातच भरुन सदर श्रेणी तक्त्याचे पाकिट पाठवावे. तसेच श्रेणीतक्त्याच्या पाकिटावर ठळक अंकात शाळेचा सांकेतिक क्रमांक लिहावा. श्रेणीतक्ते वेळेत जमा न केल्यास विद्यार्थ्यांच्या निकालाचे कामात काही समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी. **श्रेणीतक्ते भरताना घ्यावयाची काळजी -**

१) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते OMR पध्दतीने भरावयाची आहेत. (अ) सदरहू श्रेणीतक्त्यामध्ये हे P1 (Physical Education) & R7 (स्वविकास व कलारसास्वाद) हे शालेय विषय सक्तीचे असल्यामुळे त्यांचे विषय कोड श्रेणी तक्त्यात नमूद केलेले आहेत. या विषयाच्या खालील चौकटीमध्ये आतील चौकटीला स्पर्श न करता खालीलप्रमाणे अंकामध्ये (Numeric Code) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. (ब) शालेय वैकल्पिक विषयाची श्रेणी भरताना विषय क्रमांकासाठी २ चौकटी दिलेल्या आहेत. त्या २ चौकटीच्या आतील चौकटीला स्पर्श न करता विषय कोड दर्शविण्यात यावा व त्याच्यापुढील श्रेणी चौकटीच्या आतील चौकटीमध्ये खालीलप्रमाणे अंकामध्ये (Numeric Code) श्रेणी नोंदविण्यात याव्यात. उदा.

| Index No | Grade Code |
|---|---|
| P 4 | 3 |

२) पुनर्परीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांची श्रेणीतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणेच भरण्यात यावी. फक्त गैरहजर विद्यार्थ्यासाठी **A** अशी श्रेणी नोंदविण्यात यावी. श्रेणी तक्ते भरताना **कोणत्याही परिस्थितीत व्हाईटनरचा वापर करणेत येवू नये .**

३) श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर शालेय व ऐच्छिक विषयाचे **सांकेतांक (Index No.)** नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादित केलेली श्रेणी (Grade) अंकामध्ये (Numeric Code मध्ये) अचूक नोंदवाव्यात. श्रेणी तक्त्यात श्रेणी नोंदविताना श्रेणी तक्त्याच्या खाली मुद्रित करण्यात आलेल्या सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन खालील प्रमाणे श्रेणीची नोंद करावी.

- A ग्रेडसाठी — 3 (60% & above marks)
- B ग्रेडसाठी — 2 (45% & 59% marks)
- C ग्रेडसाठी — 1 (35% & 44% marks )
- D ग्रेडसाठी — 0 (35% & below marks)
- E ग्रेडसाठी — 4 (Exempted subject )
- गैरहजरसाठी विद्यार्थ्यासाठी — A
- दिव्यांग अस्थिव्यंग विद्यार्थ्यांसाठी — 5 (फक्त शारीरीक शिक्षणा विषयाकरीता) (मात्र इतर विषयास श्रेणी द्यावी)
- मार्च २००८ पूर्वीचे परीक्षार्थी सप्टें ऑक्टो-२०२१ च्या परीक्षेस रिपीटर म्हणून प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्यांची R7 या विषयाची **N** श्रेणी दर्शवावी.

४ ) पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे शालेय वैकल्पिक विषयास पास श्रेणी मिळून त्यांचा तो विषय सुटलेला असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे श्रेणीतक्ते भरताना त्या विषयापुढे विषय सूटसाठी 4 (Exempted) अशी अंकात श्रेणी दर्शवावी.

५)काही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी/ज्या विद्यार्थ्यांचे श्रेणी परीक्षेचे विषय सुटलेले नाहीत असे विद्यार्थी सप्टें ऑक्टो-२०२१ च्या परीक्षेस प्रविष्ठ होत असतील तर त्याचे श्रेणीतक्ते भरताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकासमोर ऐच्छिक विषयाचे कोड नंबर |P2 TO P5| यापैकी अथवा |P2 TO P9| यापैकी नमुद करून त्या विषयात विद्यार्थ्याने संपादीत केलेल्या श्रेणी चा क्रमांक (Grade) अचूक नोंदवावा.

६) ज्या विद्यार्थ्यांना एप्रिल मे-२१ व त्यापूर्वीच्या परीक्षेत श्रेणी विषयामध्ये सूट मिळालेली नाही अथवा विद्यार्थी उत्तीर्ण झालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमातील नव्याने समाविष्ट झालेला शालेय श्रेणी विषयातील स्व-विकास व कला रसास्वाद (R7), हा श्रेणी विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण व्हावे लागेल.

**७) गैरहजर विद्यार्थ्यांसाठी A व ३५% पेक्षा कमी श्रेणी दर्शविताना ० श्रेणी लाल शाईने लिहाव्यात.** मात्र या श्रेणी लिहिण्यापूर्वी **विद्यार्थ्यास ३५% पेक्षा कमी गुण व विद्यार्थी गैरहजर असल्याची खात्री करूनच श्रेणी लिहाव्यात.** मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की निकालानंतर 0 व A श्रेणी दिलेला विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही केवळ या श्रेणी दिल्यामुळे त्यांचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होतो. निकालानंतर शाळाप्रमुख श्रेणी दुरूस्ती व निकाल दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करतात. निकालानंतर कोणत्याही श्रेणीमध्ये व निकालात बदल केला जाणार नाही व विद्यार्थ्यास चूकीची श्रेणी दिल्यामुळे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

**८) सप्टें-ऑक्टो २०२१ परीक्षेकरीता काही विद्यार्थ्यांनी अतिविलंबाने आवेदनपत्रे सादर केलेली आहेत. अशा विद्यार्थ्यांची नोंद आपणांस पाठविण्यात आलेल्या GRADE LIST शीट च्या बैठक क्रमांकाच्या यादीमध्ये आलेली नाही. त्यामुळे GRADE LIST तक्त्यात शेवटी अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक हाताने लिहून त्या बैठक क्रमांकासमोर विद्यार्थ्यांची शालेय व वैकल्पिक विषयांची श्रेणी द्यावी.**

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रति,**

**सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा प्रमुख व वितरण केंद्र प्रमुख सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हा.**